RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ८, अंक १०२] शुक्रवार, जुलै २९, २०२२/श्रावण ७, शके १९४४ [पृष्ठे ५, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक २६८**

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### सार्वजनिक बांधकाम विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २९ जुलै २०२२.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र मोटार वाहन कर अधिनियम.**

क्रमांक खाक्षेस-२००८/प्र.क्र.८६/रस्ते-८.—त्याअर्थी, मुंबई मोटार वाहन कर अधिनियम, १९५८ याच्या कलम २० ची पोट-कलमे (१-अ), (१-ब), (१-क), (१-ड) आणि (१-इ) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या आणि त्याला समर्थनीय करणाऱ्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन याद्वारे घोषित करते की, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत बांधा, वापरा व हस्तांतरित करा (BOT) या तत्त्वावर त्यांच्या खर्चाने बांधण्यात आलेल्या वांद्रे-वरळी सागरी जोडरस्त्याच्या (वांद्रे ते वरळी) वापर करणाऱ्या व खालील अनुसूचीच्या स्तंभ (२) मध्ये अनुक्रमे विनिर्दिष्ट केलेल्या प्रकारच्या मोटार वाहनांवर आणि वाहनांकडून ओढून नेल्या जाणाऱ्या अनुयानांवर अनुसूचीच्या स्तंभ (३) मध्ये त्यांच्यासमोर विनिर्दिष्ट केलेल्या दराने “१ एप्रिल २०२१ ते दि.३१ मार्च २०२४”, “१ एप्रिल २०२४ ते दि.३१ मार्च २०२७”, “१ एप्रिल २०२७ ते दि.३१ मार्च २०३०”, “१ एप्रिल २०३० ते दि.३१ मार्च २०३३”, “१ एप्रिल २०३३ ते दि.३१ मार्च २०३६” आणि १ एप्रिल २०३६ ते दि. ३१ मार्च २०३९ या कालावधीकरिता वांद्रे-वरळी सागरी सेतू प्रकल्पांतर्गत वांद्रे येथे बांधण्यात आलेल्या पथकर नाक्यावर पथकर बसविण्यात यावा.

## अनुसूची

| अ. क्र. (१) | वाहनाचा प्रकार (२) | दिनांक १ एप्रिल २०२१ ते ३१ मार्च २०२४ या कालावधीकरिता पथकराचे प्रतिफेरीचे दर (रुपये) (३) | दिनांक १ एप्रिल २०२४ ते ३१ मार्च २०२७ या कालावधीकरिता पथकराचे प्रतिफेरीचे दर (रुपये) (४) | दिनांक १ एप्रिल २०२७ ते ३१ मार्च २०३० या कालावधीकरिता पथकराचे प्रतिफेरीचे दर (रुपये) (५) | दिनांक १ एप्रिल २०३० ते ३१ मार्च २०३३ या कालावधीकरिता पथकराचे प्रतिफेरीचे दर (रुपये) (६) | दिनांक १ एप्रिल २०३३ ते ३१ मार्च २०३६ या कालावधीकरिता पथकराचे प्रतिफेरीचे दर (रुपये) (७) | दिनांक १ एप्रिल २०३६ ते ३१ मार्च २०३९ या कालावधीकरिता पथकराचे प्रतिफेरीचे दर (रुपये) (८) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मोटार वाहन अधिनियम, १९८८ (१९८८ चा ५९) मध्ये नमूद केल्याप्रमाणे हलकी मोटार वाहने,– | | | | | | |
| | (अ) कार, जीप जसे की, टाटा सुमो, ट्रॅक्स, कमांडर इतर तत्सम वाहने (चालक वगळून १२ प्रवासी क्षमता असलेली) वाहनचालक वगळून सहा आसनी प्रवासी रिक्षा वाहने. | ८५ | १०० | ११५ | १४० | १६५ | २०० |
| | (ब) मिनी बस किंवा तत्सम वाहने (चालक वगळून १२ पेक्षा जास्त पण २० प्रवासी क्षमतेपर्यंत) आणि अनुक्रमांक २ मध्ये नमूद केलेल्या वाहनाव्यतिरिक्त माल वाहतूक करणारी वाहने. | १३० | १६० | १९० | २२५ | २६५ | ३१५ |
| २ | ट्रक, बस. | १७५ | २१० | २४५ | २९५ | ३५० | ४२० |

**टीप :-**

१. पथकराच्या दरामध्ये खालीलप्रमाणे सवलती देण्यात येते :—

(१) पथकराच्या ५० कुपन्सची आगाऊ खरेदी करणाऱ्या वाहनधारकास पुस्तिकेच्या किमतीमध्ये १० टक्के सवलत देण्यात येईल.

(२) पथकराच्या १०० कुपन्सची आगाऊ खरेदी करणाऱ्या वाहनधारकास पुस्तिकेच्या किमतीमध्ये २० टक्के सवलत देण्यात येईल.

(३) वारंवार प्रवास करणाऱ्या वाहनासाठी परतीच्या पासाचे व दैनिक पासाचे दर हे त्या वाहनाच्या एकेरी पथकराच्या दराच्या अनुक्रमे दराच्या दीड पट व अडीच पट असतील. परतीचा व दैनिक पास ज्या दिनांकास देण्यात आला असेल, त्या दिवशीच्या रात्री १२-०० वाजेपर्यंत वैध राहील.

(४) मासिक पासाचे दर एकेरी प्रवास दराच्या ५० पट राहतील.

२. खालील वाहनांना पथकरातून सुट देण्यात येईल :—

(१) राष्ट्रपती, उप राष्ट्रपती, राज्यांचे राज्यपाल किंवा वाहनावर लाल दिवा लावण्याची परवानगी असलेले लोकप्रतिनिधी प्रवास करीत असलेली वाहने.

(२) संसदेचे विद्यमान सदस्य तसेच महाराष्ट्र विधानसभा व महाराष्ट्र विधानपरिषदेचे विद्यमान सदस्य प्रवास करीत असलेली वाहने.

(३) महाराष्ट्रातील माजी संसद सदस्य किंवा महाराष्ट्र विधानसभा व महाराष्ट्र विधानपरिषदेचे माजी सदस्य प्रवास करीत असलेली वाहने.

(४) केंद्र व राज्य शासकीय वाहने.

(५) लष्करी वाहने.

(६) पोलीस दलाची वाहने.

(७) अग्निशमन दलाची वाहने.

(८) रुग्णवाहिका.

(९) शववाहिका.

(१०) टपाल व तार खात्याची वाहने.

३. वरील अनुसूचीमध्ये नमूद केलेले पथकर दर हे पथकर नाक्याजवळील परिसरामधील वाहनधारकांना स्पष्टपणे दिसतील अशा प्रकारे सूचना फलकांवर दर्शविण्यात यावे; तसेच पथकर नाक्यावरुन जाणाऱ्या प्रत्येक वाहनाची पथकर वसुलीची पावती देण्यात यावी.

४. पथकर नाक्यावरील इलेक्ट्रॉनिक फलक हे येणाऱ्या व जाणाऱ्या सर्व लोकांना स्पष्टपणे दिसतील अशा पद्धतीने लावण्यात यावेत.

५. उपरोल्लेखित पथकर नाक्यावर उपरोल्लेखित कालावधीसाठी पथकर वसूल करण्याचा आणि वसूल झालेल्या पथकराची संपूर्ण रक्कम ठेवून घेण्याचा हक्क महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांना प्रदान करण्यात आला आहे.

खालील प्रकारच्या वाहनांचा वांद्रे-वरळी सागरी जोड रस्त्याचा (वांद्रे ते वरळी) वापर करण्यात मज्जाव करण्यात येत आहे :–

(१) मोटार सायकल, स्कुटर, मोपेड, ट्रॅक्टर आणि रिकाम्या ट्रॉलीसह ट्रॅक्टर आणि चालक वगळून तीन प्रवासी क्षमतेची ॲटो रिक्षा.

(२) प्राण्यांकडून ओढण्यात येणारी वाहने व हळू चालणारी वाहने.

(३) वरील अनुसूचीत अनुक्रमांक (२) येथे नमूद केलेल्या जड वाहनांव्यतिरिक्त मोटार वाहन अधिनियम, १९८८ (१९८८ चा ५९) अन्वये नमूद केलेली जड वाहने जसे की, ट्रक ट्रेलर्स, दोन पेक्षा जास्त आसांची वाहने.

६. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (मर्या.) यांना या अधिसुचनेद्वारे त्यांचेमार्फत वांद्रे-वरळी सागरी सेतू या प्रकल्पाअंतर्गत बांधण्यात आलेल्या पथकर नाक्यावर पथकर जमा करणे व सदर रक्कम राखून ठेवण्याचे अधिकार या अधिसूचनेद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**प्रशांत द. नवघरे,**
शासनाचे सचिव.

## PUBLIC WORKS DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 29th July 2022.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA MOTOR VEHICLES TAX ACT.

No. PPP-2008/CR-86/Road-8.—In exercise of the powers conferred by sub-sections (*1-A*), (*1-B*), (*1-C*), (*1-D*) and (*1-E*) of section 20 of the Maharashtra Motor Vehicles Tax Act (LXV of 1958), and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby declares that the toll shall be levied on the classes of motor vehicles specified in column (2) of the Schedule appended hereto and on the trailors drawn by such motor vehicles, passing over the section of the Bandra-Worli-Sea Link Road (Bandra to Worli) under the "Built, Operate and Transfer (BOT) Basis" by the Maharashtra State Road Development Corporation Limited, at their expenses, at the rates specified against each of the said vehicles in column (3) of the said Schedule, with effect from the "1st April 2021 to 31st March 2024", "1st April 2024 to 31st March 2027", "1st April 2027 to 31st March 2030", "1st April 2030 to 31st March 2033", "1st April 2033 to 31st March 2036" & "1st April 2036 to the 31st March 2039, at toll collection centre constructed on the said road.

### *Schedule*

| Sr. No. | Particulars of motor vehicles | Rate of toll per trip (in rupees) | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | for the period 01.04.2021 to 31.03.2024 | for the period 01.04.2024 to 31.03.2027 | for the period 01.04.2027 to 31.03.2030 | for the period 01.04.2030 to 31.03.2033 | for the period 01.04.2033 to 31.03.2036 | for the period 01.04.2036 to 31.03.2039 |
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) | (8) |
| 1. | Light motor vehicles as defined in the Motor Vehicles Act, 1988 (59 of 1988), - | | | | | | |
| | (a) Car, Jeep such as Tata Sumo, Trax, Commander, or any other similar vehicles (having carriage capacity upto twelve passengers, excluding driver), Six Seater Rickshaw (Tum-Tum), etc.; | 85 | 100 | 115 | 140 | 165 | 200 |
| | (b) Mini Bus or any other similar vehicles having carriage capacity of more than twelve and upto twenty passengers, excluding driver and goods carriage vehicles | 130 | 160 | 190 | 225 | 265 | 315 |
| 2. | Trucks (two axles), Buses. | 175 | 210 | 245 | 295 | 350 | 420 |

*Notes* :—

1. Concessions in rates of toll are as given below, namely :—

(*i*) Ten per cent. rebate will be given to the purchase of booklet containing fifty coupons in advance.

(*ii*) Twenty per cent. rebate will be given to the purchase of a booklet containing hundred coupons in advance.

(*iii*) The rates of return journey pass and daily pass for frequently travelling vehicles, shall be 1.5 times and 2.5 times of their respective one way travel rates. Return journey pass and daily pass will be valid up to 12.00 hours at midnight for the day of issuing the pass.

(*iv*) Rate of monthly pass will be fifty times of their respective one way travel rates.

2. The following types of vehicles are exempted from payment of toll, namely :—

(*i*) VVIP vehicles carrying President of India, Vice-President of India, Governor of State, Public Representatives entitled for red lamp on their vehicles.

(*ii*) Vehicles carrying sitting Members of Parliament, Maharashtra Legislative Assembly and Maharashtra Legislative Council.

(*iii*) Vehicles carrying Ex-Members of Parliament, Maharashtra Legislative Assembly and Maharashtra Legislative Council.

(*iv*) State and Central Government Vehicles.

(*v*) Defense Vehicles.

(*vi*) Police Department Vehicles.

(*vii*) Post and Telegraph Department Vehicles.

(*viii*) Ambulances.

(*ix*) Hearses.

(*x*) Fire fighting vehicles.

3. The above-mentioned rates of toll shall be displayed on boards clearly visible to the people in the vicinity of the toll connection centre. A receipt shall be passed on each and every and every occasion of recovery of toll.

4. Electronic Display Board clearly visible to the people shall be installed in vicinity of the toll collection centre.

5. The following types of vehicles have no access to the Bandra-Worli Sea Link Road, i.e. Bandra to Worli section, namely :—

(*a*) Motor Cycle, Scooter, Moped, Tractor with unladen trolly and Auto-Rickshaw registered to carry three person excluding driver.

(*b*) Animal drawn vehicle and slow moving vehicle.

(*c*) Heavy motor vehicles as defined in the Motor Vehicles Act, 1988 (59 of 1988) such as truck trailers, multi axle vehicles, etc., except vehicles covered by entry at serial number (2) of the Schedule.

6. For the purpose of this notification, the Maharashtra State Road Development Corporation Limited, Mumbai is authorised to collect and retain the amount of toll collection centre constructed at Bandra-Worli Sea Link Road (Bandra to Worli) for the above-mentioned period.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

PRASHANT D. NAOGHARE,
Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.